# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : ३
## सभावृत्तांत

दिनांक : ७/८/२००९ वेळ : दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दि.७/८/२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
४. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
६. मा.खोमणे लता हनुमंत
७. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
८. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.काळे - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

(सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा.सभापती सभागृहात उपस्थित नव्हते)
खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.एकनाथ मोटे

सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा.सभापती सभागृहात उपस्थित नसल्याने सभेचे अध्यक्षस्थानी मा.वसंत लोंढे यांची निवड करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

(मा.वसंत लोंढे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले</u> -

विषय क्रमांक :- ३०) लो लेव्हल मैला पंप हाउसेस चालन देखभाल दुरुस्ती बाबत..

विषय क्रमांक :- ३१) लो लेव्हल व मैला पंप हाउसेस चालन देखभाल दुरुस्तीबाबत..

विषय क्रमांक :- ३२) सांगवी पंप हाउस चालन देखभाल दुरुस्तीबाबत..

विषय क्रमांक :- ३३) पिंपळे सौदागर पंप हाउस येथील पंपींग मशीनरींची देखभाल दुरुस्तीबाबत..

विषय क्रमांक :- ३४) नाल्यांचे बेडींग करणेबाबत..

विषय क्रमांक :- ३५) वॉर्ड क्र.५४ मधील रस्ते डांबरीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक :- ३६) रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक :- ३७) इंद्रायणीनगर येथील कामास मंजुरी मिळणेबाबत..मा.सिध्देश्वर बारणे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक :- ३८) दापोडी येथील मुख्य चौकांचे सुशोभीकरण करणेबाबत..मा.उषा ढोरे,मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक :- ३९) शिक्षण विस्तार अधिकारी वर्ग श्रेणी - २ माध्यमिक पद निर्माण करणेबाबत..मा.सिध्देश्वर बारणे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक :- ४०) भोसरी येथे स्थापत्य विषयक सुधारणा करणेबाबत..मा.उषा ढोरे, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव..

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक :- मा.उषा ढोरे अनुमोदक :- मा.एकनाथ मोटे

मंगळवार दिनांक ११/८/२००९ रोजी दुपारी १२.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

मा.सभाध्यक्ष :- मंगळवार दि.११/८/२००९ रोजी दुपारी १२:०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------------------

(वसंत (नाना)आनंदराव लोंढे)
सभाध्यक्ष
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ३
सभावृत्तांत
(दिनांक ७/८/०९ ची तहकुब सभा)

दिनांक : ११/८/२००९ वेळ : दुपारी १२:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ७/८/२००९ ची तहकुब सभा मंगळवार दि.११/८/२००९ रोजी दुपारी १२.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे
२. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
३. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
४. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
६. मा.खोमणे लता हनुमंत
७. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
८. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.काळे - नगरसचिव, मा.जाधव, , मा.दुधेकर,मा.निकम - कार्यकारी अभियंता,मा.जाधव - शिक्षणाधिकारी (माध्य), मा.पवार - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

दिनांक १७/७/०९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- ९९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/६/कावि/२१७/०९ दि.१२.५.०९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन..

खातेनिहाय चौकशीमध्ये श्रीमती सुलोचना गोवर्धन बनपट्टे - सफाई कामगार यांच्यावर सिध्द झालेले दोषारोप, अंतिम नोटीसचा त्यांचा असमाधानकारक खुलासा, चौकशीनंतरही त्यांच्या हजेरीत न झालेली सुधारणा, कर्मचारी समस्या निवारण समितीचा निर्णय व श्रीमती बनपट्टे या वारंवार आजारी पडत असल्याने भविष्यात त्यांच्या हजेरीत सुधारणा होण्याची शक्यता नसल्याने त्यांची १९८८ पासुनची सेवा विचारात घेवुन त्यांना सक्तीने सेवानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. श्रीमती सुलोचना गोवर्धन बनपट्टे यांचे जागी त्यांची सून विद्या दिपक बनपट्टे यांना कामावर घेणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०० विषय क्रमांक :- २
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.वसंत लोंढे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/२/कावि/५२५/०९ दि. १.६.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

श्री.करपे गोरक्षनाथ पुंजाराम - मल्टीपर्पज वर्कर यांची कौटुंबिक अडचण विचारात घेता, औरंगाबाद महानगरपालिका श्री.करपे यांना त्यांचे आस्थापनेवरील रिक्त पदावर सामावुन घेण्यास तयार असेल व तेथील सक्षम समितीने तसा ठराव पारीत केल्यास, त्यांची बदली करणेस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हरकत असणार नाही, मात्र अशी बदली झाल्यावर त्यांना पुन्हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कोणत्याही कारणास्तव बदली अथवा पुर्ननियुक्ती दिली जाणार नाही, या अटीवर ना-हरकत प्रमाणपत्र देता येणार असल्याने तसे ना-हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता देणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०१ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.उषा ढोरे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/६६०/०९ दि.४.६.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

पदोन्नती समितीने वरिष्ठ लिपीक पदावरील खालील कर्मचा-यांना त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या प्रवर्गातुन र.रु.६५००- १०५०० या वेतनश्रेणीत नायब तहसीलदार पदावर पदोन्नती देण्यास शिफारस केली असुन त्याबाबत खालीलप्रमाणे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार केली असल्याने निवड यादी - १.श्री.माशाळे शिवाजी दौलतराव (अनु.जाती) २.श्री गावडे सुरेश किसनराव (खुला)३.श्री.गवारे नामदेव निवृत्ती (खुला) प्रतिक्षा यादी - १.श्रीम.वाजे कुसुम गेणुभाउ (खुला - अनु.जमाती), २.श्री.लुणावत नरेंद्र दगडुराम (खुला) ३.श्री.गावडे विजय तुकाराम (खुला) ४.श्रीम.राजगुरु अनुराधा शाम (खुला) व उपरोक्तपैकी श्री गावडे सुरेश किसनराव यांना शासन निर्णय क्र.इ एक्स डी - १०७६/१९४५/१३७ - XVII दिनांक १ नोव्हेंबर १९९७ नुसार महापालिका सेवेत वयाची ४५ वर्षे पुर्ण झाली असल्याने एल एस जी डी परिक्षेतुन सुट देण्यात आली असल्याने वरील कर्मचा-यांना नायब तहसीलदार पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०२ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/६६१/०९ दि.४.६.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

महापालिका आस्थापनेवरील वीजतंत्री अभिनामाची पदे पदोन्नतीने भरताना, तारतंत्री, जनित्रचालक, इले.मोटार पंप ऑपरेटर व ऑपरेटर या पदावरील कर्मचा-यांची परस्परांतील जेष्ठतेनुसार, पदोन्नतीसाठी तात्पुरती सेवाजेष्ठता यादी तयार करावी व त्यामधुन सेवाजेष्ठ कर्मचा-यांना वीजतंत्री पदावर पदोन्नती देणेत यावी या धोरणास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०३ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/६६२/०९ दि.४.६.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..
लिपीक(प्रशासकीय संवर्ग) या पदाचे दिनांक ३१/१२/२००७ अखेरचे अंतिम

सेवाजेष्ठता यादीनुसार १.श्रीम.भोजने मंगला ज्ञानदेव (अनु.जमाती),२.श्री.बो-हाडे रविंद्र सिताराम(अनु.जमाती), ३.श्री.कोरके सुनिल लक्ष्मण (अनु.जमाती) ४.श्री जाधव प्रकाश ज्ञानोबा (विजा-अ), ५.श्री गायकवाड शशिकांत किसन (विजा-अ) ६. श्री गायकवाड दिपक दत्तात्रय (भज-ब) ७. श्री.सानप मधुकर तान्हाजी (भज-ड) या कर्मचा-यांना त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या प्रवर्गातुन र.रु.५५००-९००० या वेतनश्रेणीत उपलेखापाल पदावर पदान्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०४ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. प्रशा/१/कावि/५५५/०९ दि.४.६.०९
विषय :- जेष्ठ वैद्यकिय अधिकारी पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणुकीबाबत..
विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०५ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : झोनिपु
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.वसंत लोंढे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/६/कावि/१९१/०९ दि.२०.६.०९
विषय :- कै.महेश गायकवाड यांचे वारसांना मदत करणेबाबत..
विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०६ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : विद्युत
सुचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. वि/वायसीएमएच/१४२/०९ दि.४.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात प्रकाश व्यवस्था करणे व विविध नवीन अंतर्गत विभागात उपकरणांकरीता विद्युतीकरण व अनुशंगिक कामे करणेकामी र.रु.४९,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०७ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/३अ/कावि/४५३/०९ दि.९.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

श्री.चाटे वैजनाथ आण्णासाहेब,फायरमन यांनी राजीनामा मंजूर करणेबाबत केलेली विनंती, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार मनपा कोषागारात भरलेले एक महिन्याचे मूळ वेतन व सहाय्यक आयुक्त, अग्निशामक यांनी श्री.चाटे वैजनाथ आण्णासाहेब यांचा राजीनामा मंजूरीबाबत केलेली शिफारस इ. बाबी विचारात घेऊन श्री.चाटे वैजनाथ आण्णासाहेब यांचा राजीनामा दि.२२/५/२००९ पासून मंजूर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०८ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य ड मुख्यालय
सुचक :- मा.वसंत लोंढे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/डमु/४८७/०९ दि.२०.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

पिंपरी वॉर्ड क्र.७२ येथे स्थापत्यविषयक दुरुस्तीविषयक कामे करणे (३७७/१७) कामी र.रु.४५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०९ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : पाणीपुरवठा
सुचक :- मा.उषा ढोरे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. पापु/११७३/०९ दि.२०.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

ड प्रभागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करणेकामी र.रु.२०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ११० विषय क्रमांक :- १२
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. स्था/बप्र/काअ/ ७४/०९ दि.२३.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

आकुर्डी आरक्षण क्र.२७५ प्राथमिक शाळेच्या मोकळ्या जागेत संरक्षक भिंत बांधणेकामी र.रु.१५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- १११ विषय क्रमांक :- १३
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य उद्यान
सुचक :- मा.वसंत लोंढे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. स्था/१/कावि/७७६/०९ दि.१७.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

पिंपरी स.न.१४४ पैकी व १४९/१ पैकी (वास्तु उद्योग-अजमेरा कॉलनी) येथील मंजूर रेखांकनामधील खुल्या जागेवर उद्यान विकसित करणेकामी र.रु.१५,३८,५००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ११२ विषय क्रमांक :- १४
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/७०१/ ०९ दि.१८.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

प्र.क्र.१,२,३ मधील डांबरी रस्त्यांची किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी र.रु.३९,४३,५००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ११३ विषय क्रमांक :- १५
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : भूमि आणि जिंदगी
सुचक :- मा.उषा ढोरे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/हॉकर्स/१/कावि/६१०/०९ दि.१८ .७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

महापालिकेने तयार केलेल्या हॉकर्स धोरण २००७ यास मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७ दि.१२/१०/२००७ अन्वये मान्यता मिळालेली आहे तो रद्द करुन महाराष्ट्र शासनाने नव्याने दिलेल्या फेरीवाला व्यवसायाच्या आदर्श उपविधी २००९ नुसार "पिंपरी चिंचवड महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २००९" मसुद्यास मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ११४ विषय क्रमांक :- १६
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : भुगयो
सुचक :- मा.वसंत लोंढे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/९६/०९ दि.२१.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

भुगयो अंतर्गत दापोडी, फुगेवाडी व काळेवाडी पंप हाऊसेस वार्षिक चालन देखभाल व दुरुस्ती करीता देणेकामी र.रु.४९,८१,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ११५ विषय क्रमांक :- १७
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१अ/कावि/४२६/०९ दि.२२.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन..

पाणीपुरवठा-जलशुद्धीकरण केंद्राचे कामकाज व कामाची निकड विचारात घेता पाणीपुरवठा विभागाच्या आस्थापनेवर एकुण ७ संवर्गात ६५ पदे नव्याने निर्माण करण्यास त्यापैकी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ६१ पदे पुर्वीचे मंजुर अर्हतेत तर उर्वरित ०४ पदे सोबतचे प्रपत्र अ मधील अर्हतेत निर्माण करण्यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी मान्य करणेत यावी व त्याव्यतिरीक्त महापालिका आस्थापनेवरील गाळणी चालक व असि.गाळणी निरीक्षक या दोन्ही पदांची वेतनश्रेणी समान म्हणजेच र.रु.४००० - ६००० अशी असून सदर पदावरील कर्मचा-यांना पदोन्नती सोपान नसल्याने गाळणी निरीक्षक संवर्गातील एकुण पदांपैकी ७०% पदे सरळसेवेने तर ३०% पदे पदोन्नतीने भरण्यास व ३०% पदे पदोन्नतीने भरण्या करीता येणारी पदे प्रपत्र ब मधील अर्हतेनुसार भरण्यास मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस

करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ११६ विषय क्रमांक :- १८
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.उषा ढोरे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. स्था/अ.मु/१५४/०९ दि.२७.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

प्रभाग क्र.३७,४९,५०,५३,५४,५५ मध्ये नव्याने विकसित होणा-या भागाचे रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी र.रु. २५,६०,५००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ११७ विषय क्रमांक :- १९
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अमु/१५२/०९ दि.२७.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

प्रभाग क्र.४९ मध्ये खडीकरण, डांबरीकरण व गटर्स दुरुस्ती करणेकामी र.रु.४९,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ११८ विषय क्रमांक :- २०
दिनांक :- ११/०८/२००९
सुचक :- मा.उषा ढोरे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :- १) मा.तानाजी खाडे व मा.बाळासाहेब भुंबे यांचा प्रस्ताव..
२) मा.झोपडपट्टी सुधार,गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती सभा दिनांक २०.७.२००९,ठराव क्रमांक ६
विषय :- श्री.डी.एन.गट्टुवार यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देणेबाबत..

विषय क्रमांक २० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ११९ विषय क्रमांक :- २१
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य पाणीपुरवठा
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/पापु/१२१४/०९ दि.२७.४.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..
निगडी पेठ से.२३ येथील जलशुध्दीकरण केंद्र टप्पा - २ खाजगी ठेकेदारामार्फत चालविणेकामी र.रु. ३१,३०,५३०/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १२० विषय क्रमांक :- २२
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.वसंत लोंढे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अ.मु/१५३/०९ दि.२७.७.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..
प्राधिकरण प्रभाग क्र.५५ से.२४,२५,२६ मधील इमारतींची दुरुस्ती करणेकामी र.रु.१२,७९,५००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १२१ विषय क्रमांक :- २३
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्थापत्य/अप्र/७३६/०९ दि.२८.७.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..
प्र.क्र.१,२,३ मधील नाला व्ही शेप करणे व नाला ट्रेनिंग करणेकामी र.रु.३२,०१,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १२२ विषय क्रमांक :- २४
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.उषा ढोरे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. स्था/अप्र/७४४/०९ दि.२९.७.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..
आकुर्डी खंडोबा माळ ते दळवीनगर आर.ओ.बी. साईडपट्टीचे रुंदीकरण व पावसाळी गटर करणेकामी र.रु.३२,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १२३ विषय क्रमांक :- २५
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : अ प्रभाग स्थापत्य
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/स्थापत्य/७५२/०९ दि.२९.७.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

आकुर्डी खंडोबा माळ येथे १२.०० मी रुंदीच्या रस्त्याच्याकडेने शाळेच्या मैदानासाठी गॅलरी व हॉकर्स झोनसाठी गाळे बांधणे व किरकोळ दुरुस्ती देखभाल करणेकामी र.रु.२५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १२४ विषय क्रमांक :- २६
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य अ प्रभाग
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/स्थापत्य/७५३/०९ दि.२९.७.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

वॉर्ड क्र.४१ मधील मोहननगर जलतरण तलावाजवळील मोकळया जागेत बॅडमिंटन हॉल बांधणे, व लॉन टेनिस ग्राउंड तयार करणेकामी र.रु. ४९,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १२५ विषय क्रमांक :- २७
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.उषा ढोरे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/७५४/०९ दि.२९.७.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

वॉर्ड क्र.४१ काळभोर नगर येथील रस्त्याच्या कडेने स्टॉर्म वॉटर पाईप टाकणे व फुटपाथ करणेकामी र.रु.३८,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १२६ विषय क्रमांक :- २८
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/७५५/०९ दि.२९.७.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

एम.आय.डी.सी.डी ३ ब्लॉक मधील उर्वरीत रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी र.रु.३२,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १२७ विषय क्रमांक :- २९
दिनांक :- ११/०८/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/७५६/०९ दि.२९.७.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

आकुर्डी दवाखान्याशेजारी १२.०० मी.रस्त्याच्या कडेला असलेल्या रिटेनिंग वॉल बांधणे व नाल्याची उंची वाढविणेकामी र.रु.२५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले :-

ठराव क्रमांक :- १२८ विषय क्रमांक :- ३०
दिनांक :- ११.०८.२००९ विभाग :- भुगयो
सुचक :- मा. वसंत लोंढे अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/१०७/०९ दि.३१.०७.२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी मेन, पिंपरी वाघेरे व पिंपरी लो लेव्हल मैला पंप हाऊसेस चालन देखभाल दुरुस्तीकरीता देणेकामी र.रु.४८,९४,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १२९ विषय क्रमांक :- ३१
दिनांक :- ११.०८.२००९ विभाग :- भुगयो
सुचक :- मा. वसंत लोंढे अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/१०६/०९ दि.३१.०७.२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

गोखले पार्क, काकडे पार्क, चिंचवड लो लेव्हल व केशवनगर मैला पंप हाऊसेस चालन देखभाल दुरुस्तीकरीता देणेकामी र.रु.४६,१४,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १३० विषय क्रमांक :- ३२
दिनांक :- ११.०८.२००९ विभाग :- भुगयो
सुचक :- मा. वसंत लोंढे अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/१०४/०९ दि.३१.०७.२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

भुगयो अंतर्गत सागंवी स.नं.६ पंप हाउस चालन देखभाल दुरुस्ती करीता देणेकामी र.रु.१५,७२,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १३१ विषय क्रमांक :- ३३
दिनांक :- ११.०८.२००९ विभाग :- भुगयो
सुचक :- मा. वसंत लोंढे अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/१०३/०९ दि.३१.०७.२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

भुगयो अंतर्गत पिंपळे सौदागर पंप हाऊस येथील पंपींग मशीनरींची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी र.रु.२१,२६,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १३२ विषय क्रमांक :- ३४
दिनांक :- ११.०८.२००९ विभाग :- स्थापत्य
सुचक :- मा. वसंत लोंढे अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्थापत्य/अ.मु.का./१९७/२००९ दि.२७.७.२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

वॉर्ड क्र.५४ आकुर्डी मुख्य रस्त्यापासुन ते गंगानगर मुख्य रस्त्याच्या नाल्याचे बेडींग करणे (४०/०९) कामी र.रु.४९,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १३३ विषय क्रमांक :- ३५
दिनांक :- ११.०८.२००९ विभाग :- अ प्रभाग स्थापत्य
सुचक :- मा. वसंत लोंढे अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/२०९/२००९ दि.०५.०८.२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

वॉर्ड क्र.५४ मधील रस्ते डांबरीकरण करणेकामी र.रु.३१,९९,५००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १३४ विषय क्रमांक :- ३६
दिनांक :- ११.०८.२००९ विभाग :- अ प्रभाग स्थापत्य
सुचक :- मा. वसंत लोंढे अनुमोदक :- मा.उषा ढोरे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/स्थापत्य/७८७/०९ दि.०५.०८.२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मोहननगर व रामनगर येथील स.नं.१२६, १२७ व १३७ परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी र.रु.४४,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १३५ विषय क्रमांक :- ३७
दिनांक :- ११.०८.२००९
सुचक :- मा. सिध्दश्वर बारणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.सिध्देश्वर बारणे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव

इंद्रायणीनगर वॉर्ड क्र.२४ येथे रामकृष्ण मोरे उद्यान येथे शेड बांधणे करीता म.न.पा. वर्क ऑर्डर क्र.५/२१५/२००८ दिनांक ११/९/२००८ मे.व्ही.डी.चिंचवडे या ठेकेदारास देण्यात आलेले आहे. परंतु ज्या जागेसाठी शेड बांधणे सुचविले होते त्या ठिकाणी दहा बारा झाडे असल्याने शेड बांधण्यास अडथळा येत असून उद्यान विभागाकडून वृक्ष तोडीस अनुकुलता दिसत नाही या कारणास्तव ह्या शेड बांधणेचे काम थांबले आहे. वर नमूद केलेल्या वर्क ऑर्डर मधून वॉर्डातील अन्य ठिकाणी उद्यान विभागाचे काम करावयाचे जरुरीचे असल्याने हे काम वर्ग करुन सेक्टर नं.१ मधील उद्यानाची कमान व कंपाउंड व अन्य इतर काम करण्यात यावे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १३६ विषय क्रमांक :- ३८
दिनांक :- ११.०८.२००९
सुचक :- मा. उषा ढोरे अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.उषा ढोरे, मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव

विषय- दापोडी येथील मुख्य चौकांचे व पुतळ्यांचे सुशोभिकरण करणे व चौकात कमान बांधणेचे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मंजूरीबाबत र.रु.४९,९५,०००/- (निविदा नोटीस क्र.८६/५-२००६-०७) ठेकेदार मे.के.डी.कन्स्ट्रक्शन निविदा र.रु.१९,२६,२३७/- (४९.४०% जास्त) यांनी दापोडी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शहीद भगतसिंग व शहीद नारायण दाभाडे यांच्या पुतळ्यांचे सुशोभिकरणाचे काम पुर्ण केले असून विषयांकीत कामातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरण करणेचे काम बाकी आहे. सद्यस्थितीत महावीर चौक येथील स.नं.३ मधील २ गुंठे जागा उपलब्ध झाली असल्याने सदर जागेत पुतळ्याचे स्थलांतरीत करण्याचे व सुशोभिकरणाचे काम तातडीने करणेकरीता सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याची अंदाजपत्रकीय किंमत र.रु.४९,९५,०००/- इतकी येत असल्याने सदर कामाच्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १३७ विषय क्रमांक :- ३९
दिनांक :- ११.०८.२००९
सुचक :- मा. सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.सिध्देश्वर बारणे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाचे अंतर्गत सध्या १७ माध्यमिक विद्यालये व १ क्रिडा प्रबोधनी विद्यालय कार्यरत आहे. या विद्यालयाच्या प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने शिक्षणाधिकारी हे वर्ग १ चे पद असून त्यांचे मार्फत कामकाज चालू आहे. परंतू माध्यमिक विद्यालयांचे वाढते कामकाज तसेच अन्य विभागाशी सतत संपर्क राखणे, मनपा परिसरात स्थलांतर व नैसर्गिक वाढीने विद्यार्थी संख्येत वाढ झाली आहे. तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यावर नियंत्रण इ. कामकाज करावे लागते. यामध्ये समन्वय राखता येत नाही. यासाठी माध्यमिक शिक्षण विभागासाठी शिक्षणविस्तार अधिकारी वर्ग श्रेणी २ चे पद निर्माण केल्यास या पदाच्या मार्फत शाळा तपासणी, पट पडताळणी, तुकड्या व सेवक संच निश्चिती, अनुदान विषयक कामकाज व मा.शिक्षणाधिकारी यांच्या सुचनेनुसार प्रशासकीय व इतर कामकाज तसेच जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाशी संबंधीत कामकाज, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, एस.एस.सी. बोर्ड, शिक्षण उपसंचालक विभागाकडील कामकाज तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यावर नियंत्रण, नवीन शाळा मान्यता, शाळा स्थलांतर आणि मनपाकडील कामकाज इ. कामकाज करणे सोईचे होईल. याशिवाय समन्वयक माध्यमिक यांच्याकडे मनपाची इतर महत्वाची व तातडीची कामे सोपविता येतात. त्यांनी आतापर्यंत वेतन व वेतनेत्तर अनुदान, पेन्शन अनुदान, माध्यमिक शिक्षण विभागाचे अनुदान मंजूर करुन घेऊन मनपाचा आर्थिक फायदा केला आहे. तसेच ते भविष्यात वैद्यकीय उपचार अनुदान, इमारत भाडे अनुदान, प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत. या सर्व कामावर आवश्यक ती देखभाल व अमलबजावणी, पाठपुरावा करणे, या कामासाठी सोबतच्या परिशिष्ठ अ नुसार शिक्षणविस्तार अधिकारी वर्ग श्रेणी २ माध्यमिक हे पद निर्माण करणेस मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १३८ विषय क्रमांक :- ४०
दिनांक :- ११.०८.२००९
सुचक :- मा. उषा ढोरे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.उषा ढोरे, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव

भोसरी वॉर्ड क्र.१५ मधील अंतर्गत भागात पाईपलाईन जलनिःसारण लाईन, विद्युत केबल इ. कामासाठी खोदण्यात आलेले रस्ते, कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक, कॉंक्रीट पेव्हींग गटर्स, बंद पाईप गटर्स, कच्चे रस्ते यांची नादुरुस्त झालेल्या कामांची स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दुरुस्ती कामे करावी लागणार आहेत त्यामुळे म.न.पा.चे सन २००९-१० चे अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष इमारत व योजना पान क्र.२८९ काम क्रमांक ०८ या

कामाचे तरतुद रक्कम रु.२८,००,०००/- मधून करणेत यावीत भोसरी वॉर्ड क्र.१५ मध्ये स्थापत्य विषयक सुधारणा व देखभाल दुरुस्तीची कामे करणेच्या रक्कम रु.४२,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/ ६५७/०९
दिनांक- १३/०८/२००९ चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.